## <u>डीक्री फायनल अर्ज क्र.१८/२०२० मधील</u>
## <u>नि. ११० खालील आदेश</u>

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज नि.१ मध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

(२) अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदरील अर्जात अर्जदाराचे असे कथन आहे की, सदर अर्जातील जाबदार नं. १२-ब संजय एकनाथ सावंत हे मयत झालेले आहेत. अर्जदारास मुळ अर्ज जाबदार क्र.१२-ब यांचे विरुध्द चालविणेचा असलेने सदर जाबदाराचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहेत. त्यामुळे जाबदार क्र.१२-ब यांचे नावापुढे 'मयत' असे लिहून त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता अर्जदार याने विनंती वादी यांनी केलेली आहे.

(३) प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१२-ब१ ते १२-ब३ यांनी निशाणी ११६ येथे म्हणणे दाखल करुन जाबदार क्र.१२-ब चे वारस रेकॉर्डवर घेणेस कोणतीही हरकत नसल्याचे कथन केले आहे.

(४) अर्जदार व जाबदार तर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदाराचे कथनाप्रमाणे जाबदार क्र.१२-ब संजय एकनाथ सावंत हे दिनांक २८/०८/२०२१ रोजी मयत झाले आहे. त्याकरीता अर्जदाराने निशाणी १०९ येथे सदर जाबदाराचे मृत्युपत्र दाखल केले आहे. प्रस्तुतचा अर्ज वाटपाच्या हुकूमनाम्याकरीता दाखल केला असलेने जाबदार क्र.१२-ब चे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. परंतू जाबदार

क्र.१२-ब हे दिनांक २८/०८/2021 रोजी मयत झाले असून अर्जदाराने प्रस्तुत अर्ज दिनांक ०१/१२/२०२३ रोजी दाखल केला आहे. म्हणजेच अर्जदाराने प्रस्तुत अर्ज विलंबाने दाखल केला आहे तसेच अर्जदाराने सदर विलंबाचे कारण अर्जात नमुद केले नाही. परंतू अर्जाचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. वादीने दाखल केलेली निशाणी ११० वरील वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब द्रव्यदंडावर माफ करुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

(१) निशाणी ११० कडील अर्ज अर्जदार यांनी जाबदार यांना र.रू. ३००/- व तालुका विधी सेवा समिती, विटा (खानापूर) यांना र.रू. २००/- असा खर्च देणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

(२) सदरची दुरुस्ती अर्जदाराने सदर आदेशापसून १४ दिवसांचे आत करावी.

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2024.08.08 11:13:48 +0530

विटा.
दिनांकः- ०६.०८.२०२४.

**(श्रीमती अ. ब. सोनटक्के)**
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा. जि. सांगली.